



Dr. vasudha deo govt college of education akola 5/14/2012

# शंभरी ओलांडतांना

## एक आत्मकथन

श्री. हनुमंतराय गो.जलतारे

रिटा. डी.वाय. एस.पी.

-संकलन-

*श्रीमती प्रमोदिनी देशपांडे*

-शब्दांकन-

*प्रा. सौ. वसुधा वि. देव*

-प्रेरक-

*श्री. वसंतराव ह. जलतारे*

*ॲडव्होकेट, अकोट*

*सौ. सुहासिनी व. जलतारे*

प्रकाशन दि. : ३ / ०६ / २००५

*संपादक :*
प्रा. सौ. वसुधा वि. देव,
५, पवनसुत अपार्टमेंट,
तापडीया नगर, अकोला
फोन : ०७२४ - २४३४८२९


*प्रकाशक :*
श्री. जयंत व. जलतारे,
डी.एम.(एच.पी.)
पुत्र
श्री. नारायण व. जलतारे
विंग कमांडर, आय. ए. एफ.,
एन. डी. ए. खडवासला.


*मुद्रांकन सहाय्यक:*
सौ. शैलजा सु. तुले,
यवतमाळ.

*मुद्रक :*
श्री. पुष्कर दि. राजे
अकोला.

*मुद्रक :*
[illegible]योग प्रिंटर्स,
तापडीया नगर अकोला.
फोन : ०७२४ - २४३९०९३

**केवळ कौटुंबिक संदर्भाकरीता**


परमहंस सद्‌गुरू श्री शंकर महाराज


शंकरानुचर श्री सद्गुरू नारायणगुरू महाराज




Dr. vasudha deo govt college of education akola 5/14/2012

## मातृदेवो भव – पितृदेवो भव




गोविंदराव व सौ. चिमाबाई

# माझे आत्मकथन



Dr. Vasudha deo govt college of education akola 5/14/2012

# मनोगत.....



माझी नात सौ. वसुधा बऱ्याच दिवसांपासून माझ्या आत्मकथनाच्या प्रकाशनाबद्दल मला विनंती करते आहे. वास्तविक मी अतिशय सर्वसामान्य माणूस पण १०० वर्षे पार केलेला, त्यामुळे की काय कदाचित माझ्या आत्मकथनाबद्दल माझी नात मला म्हणत असावी. दोन वर्षांपूर्वी प्रमोद येथे आली त्यावेळेस माझ्या मनात असंख्य आठवणी येत. ह्या आठवणी काही सुखद काही दु:खद अशा संमीश्र प्रकारच्या होत्या. ह्या आठवणींच्या झंझावातात माझं मन पार भरकटुन जायचं. सांगण्याकरीता जवळ माझी सहधर्मचारीणी ह्यात नव्हती. ह्या आठवणींमुळे बऱ्याचदा माझ्या नाम स्मरणात व्यत्यय येत असे. ह्या सगळ्या आठवणींचे ओझे मला माझ्या मनावर ठेवायचे नव्हते. ह्या जगाचा निरोप घेण्यापूर्वी सगळं मन मला रीतं करायचं होतं, शांत करायचं होतं व ह्या शांत मनात केवळ नामस्मरणाचे तरंग ध्वनी मला ऐकायचे होते. ह्यावर मी एक उपाय शोधला व प्रमोदला वही पेन घेऊन रोज दुपारी बसायला सांगायचो. तिच्या समोर माझे सर्व आयुष्याबाबतचे अनुभव कथन केले. ते तिने लिहुन काढले. ही बाब बाबुराव मार्फत सौ. वसुधाला कळली. चि. बाबुरावने माझ्या या लिखाणाला आत्मकथनाचे रूप देण्याबाबत माझ्या नातीला सांगितले. सुरुवातीपासून माझ्यावर अतिशय प्रेम करणारी माझी हिरकणीच ती. तिने माझ्यावरील प्रेमापोटी व माझ्या बद्दलच्या अपार आदरापोटी हे आत्मकथन शब्दांकन केले व मला डिसेंबर २००४ रोजी सायंकाळी ऐकविले. माझ्या शताब्दीपूर्तीचे तीचे हे औक्षवण मला खूप आवडले. अतीव आनंदाने झालेल्या अश्रुपाताची मी तिला ओवाळणी घातली. ह्या पुस्तकाचे प्रकाशन केव्हाही होवो पण माझ्या आयुष्यातील घडलेल्या काही घटनांची (ज्या मी लिहुन ठेवल्यात) ही पुष्प माला मी आपणां सर्वांना व माझ्या पुढील पिढ्यांना समर्पित करतो. माझं संपूर्ण आयुष्य गुरुचरणाशी समर्पित आहेच. आपण सर्व आनंदात रहा, सुखात रहा, खुप आनंद करा, आपल्या घराण्याचे नांव अधिकाधिक उज्वल करण्याचा प्रयत्न करा. गुरु महाराज सदैव आपल्या पाठीशी आहेतच.

श्री. हनुमंतराव गो. जलतारे, आकोट

# मनोगत.....

दोन वर्षांपूर्वी असेच ती काकांच्या बोलण्यात जुन्या आठवणी आल्या. मी त्यांना म्हटले "जर तुम्ही पहीलेपासूनच आपलं जीवन वृतांत सांगितला तर मी तो लिहुन घेईन." त्यांना ही कल्पना आवडली व लगेच दुसरे दिवशीपासून लिहायला सुरुवात केली. प्रथम दोन – तीन दिवस नियमीतपणे ठराविक वेळीच मला लिहायला सांगत, पण एकूण १०० च्या वर्षांच्या कालखंडाच वर्णन व ठळक घटना सांगायला असा मर्यादीत वेळ कसा पूरणार नां ? मग त्यांच्या मनात जेव्हाही काही प्रसंगांची आठवण झाली की बाई, "आले मनी अन् घे लिहून !" असे म्हणयाचे. मी पण तितक्याच तत्परतेने लिहून घ्यायाची. मनातील विचार व शब्दांचा ओघ इतक्या जलदगतीने यायचा की ते सर्व लिहीतांना माझी नूस्ती तारांबळ उडायची. कितीदा तर तीन ते चार तास सतत लेखन चालायचे. अन् खरेच आहे एवढा वेळ दिला तेव्हाच हे लेखन कार्य होऊ शकले. पण ते लिहीत असता अक्षराकडे साफ दुर्लक्ष केले कारण अति काकांच्या बोलण्याचा, सांगण्याचा ओघ फारच गतिमान होता. जवळ जवळ दोन महिन्यात सर्व लिहील्या गेली व ढोबळ कृती तयार झाली. एखाद्या शिल्पकाराने अशा ढोबळ कृतीला घासून तराशून सुंदर कोरीव मूर्ती तयार करावी. तसे कार्य चि. वसुधाने केले. ते लिहीलेले साहित्य तीने अकोल्याला नेले. व आज जवळ जवळ दोन वर्ष मेहनत करुन त्याला शब्द माधूर्य व वाक् अलंकाराने अलंकृत करुन ही कोरीव मूर्ती आपल्या समोर सादर केली. असे हे चिकाटीचे कार्य वसुमनीनेच केले. अजूनही तिच्या लेखनाला सतत भर येवो व तिने सुंदर कलाकृती सादर कराव्यात ही ईश्वरचरणी प्रार्थना करुन माझे मनोगत संपविते.

*श्रीमती प्रमोदिनी देशपांडे*

# मनोगत......



श्री. हनुमंतराव गोविंदराव जलतारे हे नांव तसं पोलीस खात्याला नवीन नाही. एक अर्ध शतकावर हे नांव आपल्या कर्तृत्वाने कोरल्या गेलेले आहे. शिस्तप्रिय, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, करारी अधिकारी म्हणून आजही ज्यांचा लौकिक आहे जो पर्यंत पोलीस खाते अस्तीत्वात आहे तो पर्यंत ही मूल्य व ह्या मूल्यांचा उपासक हा अधिराज्य गाजवत राहणार है नक्की.

हे व्यक्तीमत्त्व म्हणजे माझे आजोबा. आजोबा ही संकल्पना ज्यांनी आमच्या मनात साकार केली. असं हे व्यक्तीमत्त्व १४ डिसेंबर २००४ रोजी त्यांनी शंभरी आलोंडली. आमच्या घराण्यातील शंभर वर्षाची ही व्यक्ती पाहून मन अभिमानाने भरून येते. त्यांच्या ह्या शंभर वर्षाच्या आयुष्यात त्यांनी चार पिढ्या पाहिल्यात. ह्या पिढ्यांनुसार कालमानानुसार अनेक स्थित्यंतरे पाहीलीत. अनेक परिवर्तन पाहीलीत. ही परिवर्तने कौटुंबिक आहेत, सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, शैक्षणिक अशा प्रकारची आहे. त्या प्रत्येक स्थित्यंतराचे ते साक्षिदार आहेत. एक विद्यार्थी, खोडकर मुलगा, पोलीस खात्यातील इन्स्पेक्टर पासून तर डी. वाय. एस. पी. पर्यंत खडतर प्रवास केलेला एक शिस्तप्रिय, कठोर, अधिकारी, मूक कर्तव्य, कठोर पती व पिता, व तेवढाच त्यांच्यातील हळुवार मनाचा आजोबा. नारायण गुरुंचा परमशिष्य. ह्या सगळ्या भूमिकांची त्यांची वाटचाल ही अतिशय विलोभनीय व खुप काही शिकविणारी आहे.

लहानपणी आजोबा आम्हाला त्यांचे अनुभव बऱ्याचदा सांगायचे. तेव्हा लहानपणाच ते केवळ कथाभाग आम्ही स्विकारायचो व खूप मजा वाटायची व त्या लहान वयातही आजोबांबद्दलचा एक अभिमान वाटायचा. आपले आजोबा किती शूर होते हा तो अभिमान होता. कुटुंबातही त्यांचा दरारा होता. पण आम्हा नातवांवर त्यांचे खूप प्रेम. विशेषत: माझ्यावर

ॐ

तर जास्तच. माझी हिरकणी म्हणून मला आजही ते संबोधतात. लहानपणापासून आजी आजोबा नावाच्या संस्कार केंद्रातच आमचं बालपण गेलेलं. आजी आजोबा, आई बाबा. ही चौकट म्हणजे संस्काराने परिपूर्ण असणारी चौकट. ह्या चौकटीच्या आंतर क्रियेतून जे संस्कार मनावर झाले त्याचा उपयोग आजही पावलोपावली होतो आहे. ह्या चौकोटीने आमच्यात कार्यक्षमता, निर्णयक्षमता, स्विकृती, सहनशीलता, समायोजन क्षमता, संयम अशा कितीतरी गोष्टीचे संस्कार केवळ आपल्या वागण्यातून केले. आपल्या कृतीतून केले.

मला आठवतंय, आम्हा सर्वांची सकाळ व्हायची ती आजोबांच्या ज्ञानेश्वरीने. आजीच्या उठा श्रीगुरु प्रभात झाली हास्यरचित भूपाळीने. बागकाम खेळणे, चांगल्या चांगल्या गोष्टी ऐकणे, रामायण, महाभारत, इसापनीती, कितीतरी. आईने केवळ आमच्या व्यक्तीमत्व विकासाच्या प्रेरणेतून लिहीलेले नाटके, कथा, सांगितलेल्या गोष्टी, बाबांचं हवा सर्वां करीता असणारी स्विकृती, शांत संयमी स्वभाव, केवळ आपल्या वागण्यातून आम्हाला मिळालेल्या व आयुष्यभर पुरुन पुरणारी शिदोरी ह्या सगळ्या ऋणातून मुक्त होणं खरोखरच अशक्य आहे. ह्या सगळ्या गोष्टी ज्या आमच्या पिढीला मिळाल्या त्या मात्र नवीन पिढीला मिळत नाही. असो.

आजोबा आता खुपच थकले आहेत. वृध्द सिंह म्हणता येईल त्यांना. आता त्यांना अनंताचे वेध लागले आहेत. पण ह्या वेळी त्यांनी सदुपयोग करुन त्यांचे अनुभव प्रमोदआत्याला लिहावयास सांगितले. तिने ते लिहून ही काढले पण हे अनुभव मौल्यवान आहेत हे पुढच्या पिढीच्या हाती पडायलाच हवेत. असा विचार जेव्हा ती. रु. बाबांनी माझ्या जवळ बोलून दाखविला तेव्हा मात्र नकळत मनात वीज चकाकली व आजोबांच्या ह्या अनुभवाचे आत्मकथनात रुपांतर कराययास काय हरकत आहे ? असा मानस मी आजोबांजवळ बोलून दाखविला त्यांनी तो तात्काळ मान्य केला. पण केवळ वही मधील साहित्य पुरेसे नव्हते. ह्या कामात श्री. बाबा

काका यांचे सहकार्य खूप मोलाचे लाभले त्यांच्या जवळील अतिशय दुर्मिळ कॅसेट्स ज्यात आजोबांनी आपल्या घराण्याचा इतिहास टेप करुन ठेवला होता त्या कॅसेट माझ्या सूर्पूद केल्या. व कॅसेट व आजोबांचे लिखित साहित्य यांच्या आधारे हे आत्मकथन लिहण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मकथन हे एका पोलीस अधिकाऱ्याचे आहे त्यामुळे कौटुंबिक कथाभागाकडे थोडे दुर्लक्ष झालेले आहे. पण त्याच्या मूळ प्रारुपाचेच केवळ हे शब्दांकन आहे. ह्या कार्यात मला सर्वांचे सहकार्य व प्रेरणा मिळाल्या आहे त्या सर्वांच्या प्रति मी ऋण व्यक्त करते. हे कार्य करत असतांना चि. पुष्कर राजे, अकोला याने आपला एलएल.बी चा अभ्यास सांभाळून ह्या पुस्तकाचे मुद्रण पूर्ण केले. मी त्याच्या बद्दल ऋण व्यक्त करते. ह्या पुस्तकाची रचना, बांधणी करण्याच्या कार्यात संचालक, सहयोग प्रिंटर्स यांचे सहकार्य लाभले. मी त्यांची ऋणी आहे.

आज आजोबा आपल्या आयुष्याच्या अंतीम टप्प्यावर आहेत. वास्तवीक त्यांच्या हयातीतच ह्या पुस्तकाचे प्रकाशन करणे हा योग जुळवून आणायचा होता परंतू माझ्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ही बाब सहज शक्य झाली नाही. परंतू योगायोग असा की ह्या पुस्तकातील शेवटच्या श्लोकाचे मुद्रण सुरु असतांनाच आजोबांच्या अंतिम प्रवासास सुरुवात झाली होती व 'तद्धाम परमं मम ।' ह्या श्लोकाच्या मुद्रणाच्याच वेळी त्यांनी देहत्याग केला हा एक योगायोगच म्हणावा लागेल. त्यायोगे त्यांच्या मृत्युचा अंतिम क्षण हा अतिशय मंगलमय व पवित्र होता. त्यांचा हा प्रवास अतिशय शांततेचा होवो ही गुरुदेवांशी प्रार्थना करते. त्यांचे हे आत्मकथन शब्दांकन करण्याचा हा माझा प्रयत्न मी त्यांच्याच चरणी अर्पण करते.

॥ हरि ॐ ॥

सौ. वसुधा वि. देव, अकोला